
या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
मंगळवार ०९ जुलै २०२४


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## डॉ. सद्गुरू पाटणकर अपरान्तला लाभलेला शुभंकर हात.

चिपळूण प्रतिनिधी



अवघे दीड महिन्याचे बाळ. जन्मानंतर दूध पोटात ठरेनासे झाले. इवलासा जीव. त्यात अवतीभोवती कोरोनाचा कहर. सगळे दवाखाने बंद. पायलॉरिक स्टीनोसिस या जीवघेण्या, लाखात एखाद्याला होणाऱ्या आजाराच दुर्दैव घेऊन जन्माला आलेलं हे सुदैवाने अपरान्त मध्ये दाखल झालं. पहिलं वहिल बाळ. कावरे बावरे आई बाबा. किती स्वप्न त्याच्या जन्माची पाहिलेली. आजाराचं स्वरूप कळल्यावर हादरलेले ते दोघे. डॉ. सद्गुरू पाटणकरांनी तो इवला जीव आपल्या शुभन्कर हातात घेतला. रॅमस्टेडची तयारी झाली. देशात फार कमी होणारी ही सर्जरी. या आधी २६ दिवसांच्या बाळावर अपरान्त मध्येच यशस्वी शस्त्रक्रिया झाली होती. कोकणातल हे दिव्य आव्हानच म्हणायचं. त्याच पुण्याईने हाती घेतलेलं हे बाळ. अगदी नाजूक जुईच फुल. पोटातच काही नाही त्यामुळं सुरकुत्यांनी आच्छादलेला मांसाचा गोळा इतकंच. दोन अडीच तासांची जीवघेणी झटापट. इतकी दुर्मिळ सर्जरी यशस्वी पार पडली. आठवडाभरात हसतं खेळतं गुटगुटीत बाळ घेऊन आईबाबा आनंदाने घरी गेले.... सोबत अपरांतचा आशीर्वाद घेऊन.... पुनर्जन्म देणार्यांना पून्हा पुन्हा हात जोडत.. आपुलकी आणि आधाराचं व्रत घेतलेलं कोकणातलं एकमेव नाव‘‘अपरान्त अपर्णा बेलोसे कदम

## वावा धरण सततच्या पावसाने भरून वाहू लागले.

तळा कृष्णा भोसले.

तळा तालुक्यातील वावा धरण दोन दिवस



पडणारया सततच्या पावसाने भरले असुन पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे.

आज सकाळी ६ वाजता या धरणाचे क्षेत्र भरले असुन धरणाच्या सांडव्यातुन २८३.१३२ क्युसेक पाणी बाहेर पडत असुन सतत पाऊस पडत असुन पावसाचा जोर तसाच तीन दिवस रहाणार असा हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे पाणी अधिक अधिक बाहेर पडत असल्याने पर्यटकांना अधिक पाण्याच्या प्रवाहात न उतरण्याच्या सुचना प्रशासनाने दिल्या आहेत.

## गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व भेट वस्तू प्रदान

गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व भेट वस्तू प्रदान कार्यक्रम लाटवण हायस्कूल माजी विद्यार्थी संघ (रजि.)



तर्फे गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सत्कार समारंभ दिनांक ०६ जुलै २०२४ शनिवार रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता मंडणगड तालुका विकास मंडळ (१४२८)मुंबई संचलित लाटवण पंचक्रोशी हायस्कूल, लाटवण या प्रशालेत आयोजित करण्यात आला होता. इयत्ता दहावी व नववी च्या गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच माजी विद्यार्थिनी मा.सौ.सुरेखा सकपाळ यांच्याकडून माजी बिद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून दोन हायस्कूलला सुपूर्द करण्यात आले, त्यामुळे सर्व वर्ग डिजिटल युक्त झाले, यापूर्वीही संघटनेकडून एक स्मार्ट टी. व्ही उपलब्ध झाला होता, त्यामुळे आता तीनही वर्गात, विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्या बद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पाटील मॅडम व शालेय समिती चेअरमान मा. श्री. दिनकरजी कदम यांनी मंडणगड तालुका विकास मंडळ ( १४२८) मुंबई या संस्थेच्या व लाटवण पंचक्रोशी हायस्कूल च्या वतीने धन्यवाद दिले व आभार व्यक्त केले. संस्थेचे सुद्धा वेळोवेळी सहकार्य लाभते आहे व यापुढेही लाभेल.संस्था, माजी विद्यार्थी संघ,व पंचक्रोशी तील पालक व शिक्षक यांच्या एकजुटीतून शाळेचा विकास नक्कीच होईल व या शाळेतून गुणवंत विद्यार्थी घडतील अशी आशा मा. मुख्याध्यापिका यांनी व्यक्त केली.ङ्ग याप्रसंगी मा. अविनाशजी सोंडकर माजी पोलीस निरीक्षक (अध्यक्ष माजी विद्यार्थी संघ )तसेच श्री. वसंतजी सुतार श्री. हेंद्रे सर , श्री. गौरव कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघ सचिव श्री मनोज चव्हाण सर यांनी केले, आभार श्री. दहिभाते सरांनी व्यक्त केले यांप्रसंगी सर्व शालेय कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी.. कामगार पालक दिनाचे आयोजन..

प्रतिनिधी राजेश बाष्टे:-

मुंबई:- स्थानिक पातळीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या छोट्या-मोठया समस्या तात्काळ सोडविण्यासाठी विभाग नियंत्रक यांनी दर सोमवारी व शुक्रवारी विभागातील एका आगारात जाऊन ‘‘ कामगार पालक दिन ‘‘ घ्यावा.ज्यामध्ये आगारातील चालक- वाहक, यांत्रिक कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांच्या समस्या, तक्रारी ऐकून घेऊन तिथेच तातडीने निराकरण करावे, अशा सूचना एसटी महामंडळाचे मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी एसटीच्या स्थानिक प्रशासनाला दिल्या




आहेत. त्यानुसार १५ जुलै,२०२४ पासून दुपारी ३ ते ५ या वेळे ‘‘ कामगार पालक दिन ‘‘ आयोजित करण्यात येणार आहे.एसटी महामंडळात सध्या सुमारे ९० हजार कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. एसटी महामंडळ हे खऱ्या अर्थाने ९० हजार कर्मचाऱ्यांचे विशाल कुटुंब आहे.

कुटुंबातील प्रत्येक सदस्य हा समाधानी असेल तर त्याची मानसिक स्थिती उत्तम राहते.

त्यामुळे तो आपल्या कर्तव्यामध्ये शंभर टक्के योगदान देऊ शकतो. स्थानिक पातळीवर चालक- वाहक, यांत्रिकी कर्मचारी यांना रजा, डयुटी, वेळापत्रकातील त्रूटी, बदल्या, बढत्या, वरीष्ठांची कार्यपद्धती, विश्रामगृह, तेथील स्वच्छता या बाबतीत अनेक तक्रारी वजा समस्या असतात. या तक्रारी आपल्या वरिष्ठांनी ऐकून घ्याव्यात व त्यावर तातडीने उपाययोजना करावी, अशी त्यांची किमान अपेक्षा असते. कर्मचाऱ्यांचे अनेक किरकोळ प्रश्न केवळ योग्य अधिकाऱ्यांपर्यंत न पोहोचल्याने अनुत्तीर्ण राहतात. यावर उपाययोजना म्हणून विभाग नियंत्रक यांनी त्यांचे ‘‘पालक‘‘ बनुन त्यांच्या समस्या ऐकून घ्याव्यात व तातडीने त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा.

जेणेकरून दैनंदिन कामाबाबत असलेल्या छोट्या मोठ्या समस्या व तक्रारी मुळे कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण होणारी अशांतता संपुष्टात येईल.

त्यांची मानसिक स्थिती सुदृढ राहिल व ते कामाच्या ठिकाणी उत्साहाने कार्यरत राहतील. हा या ‘‘ कामगार पालक दिनाचा ‘‘ मुख्य उद्देश आहे.

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने दत्त टेकडी कुरूळ येथे वृक्षारोपण श्री.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते वृक्षरोपण

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:-

पद्मश्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने रविवार दि ७ जुलै रोजी दत्त टेकडी कुरुळ येथे प्रतिष्ठानचे प्रमुख आदरणीय श्री.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून वृक्ष लागवड मोहीमेची सुरुवात करण्यात आली.




पद्मश्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांची ८ जुलै रोजी पुण्यतिथी असते. त्यानिमित्ताने डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने दत्तटेकडी कुरूळ येथे वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानचे प्रमुख आदरणीय श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी श्री राहुलदादा धर्माधिकारी, सौ .स्वरूपा वहिनी धर्माधिकारी, सौ ,स्वराली वहिनी धर्माधिकारी कु.अन्विता, कु.आराध्या, कु.अक्षरा, कुमार श्रीयन यांनीही वृक्ष लागवड केली.

या वेळी श्री.सचिन दादा धर्माधिकारी यांनी उपस्थित श्री सदस्यांना मार्गदर्शन करताना .आंबा, कदंब, उंबर, काजू, वड, पिंपळ, आवळा,करंज यासारखी झाडे लावल्याने दरवर्षी असह्य होत जाणारे तापमान,वाढत जाणारे प्रदूषण आणी त्याच वेगाने होणारी वृक्षतोड या सर्वांवर खूप वर्षे तग धरणारी वृक्ष लागवड आणी त्याचे संवर्धन हा एक प्रभावी आणी शाश्वत मार्ग आहे. आणी त्यादृष्टीने वृक्ष लागवड, त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.तसेच नुसते झाडे लावून उपयोग नाही तर त्याची निगा राखताना त्यांना वेळीच खते, औषधे व पाणी घातले पाहिजे. असे सागितले .

या वेळी श्री.सचिन दादा धर्माधिकारी, श्री.राहुलदादा धर्माधिकारी, सौ.स्वरूपा वहिनी धर्माधिकारी, सौ .स्वराली वहिनी धर्माधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन श्री सदस्याच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी श्री सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जत तालुक्यात तुफानी पाऊस, विजेचा लपंडाव सुरूच

कर्जत (जयेश जाधव)कर्जत तालुक्यात गेली दोन दिवस पावसाने जोरदार बॅटिंग करीत शेतकर्यांना दिलासा दिला आहे. माथेरानमध्येसुद्धा पावसाने जोरदार हजेरी लावली असून येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर, नेरळ-कळंब मार्गावरील दहिवली मालेगाव पुल पाण्याखाली गेला आहे.तसेच मध्य रेल्वेच्या कल्याण -कर्जत लोकलसेवा पुर्ण बंद झाल्यामुळे प्रवाशांचे हाल झाले त्यानंतर साधारण दुपारच्या वेळी लोकल सेवा सुरळीत चालू करण्यात



आली.ङ्गङ्गकर्जत तालुक्यात रविवारी (दि.७) दिवसभर पाऊस सुरू असून रात्री विजांचा कडकडाटदेखील सुरू होता. त्यामुळे तालुक्यातून वाहणार्या उल्हास नदीलादेखील पूर आला आहे. यावर्षीच्या पावसाळयातील हा पहिला पूर आला असून उल्हास नदीवरील नेरळ-कळंब रस्त्यावरील मालेगाव दहिवली येथील पुल पाण्याखाली गेला होता. पुल पाण्याखाली गेल्याने मोठ्या प्रमाणावर कचरा अडकून पडला असून दहिवली आणि मालेगाव मधील तरुणांनी एकत्र येत येथील कचरा बाजूला करण्याचे काम केले.ङ्गङ्गकर्जत तालुक्यात रविवारी (दि.७) ११५ मिली पावसाची नोंद झाली असून तालुक्यात आतापर्यंत ७९३ मिली पावसाची नोंद झाली असून गतवर्षी ३३९७ मिली पाऊस झाला होता. मात्र, या पावसामुळे तालुक्यातील शेतीच्या कामांची लगबग वाढली आहे. थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमध्ये गेली दोन दिवस मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे माथेरानमधील वीज पुरवठा सातत्याने खंडित होत असून माथेरान शहरात पर्यटकांची मोठी गर्दी असून पर्यटकांनी पावसाचा आनंद घेतला आहे. मात्र, जोरदार पावसामुळे रात्रभर विजेचा लपंडाव सुरू होता. यामुळे रात्री उशिरापर्यंत पर्यटकांना बाजारपेठेत थांबता आले नाही. माथेरान शहरात रविवारी तब्बल २२० मिली पाऊस झाला असून आतापर्यंत ११४२ मिली पाऊस झाला आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सितराम काळकुटे यांनी माउली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )